**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक १७/०७/२०१७ (सोमवार)**
**(दुपार)**

---

## दुखापत

**पो.स्टे. बेला** :- अंतर्गत ०.५ कि.मी अंतरावर मौजा बेला टाऊन येथे दिनांक १५/०७/२०१७ चे २४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे- सतिश बाळकराम परतेकी, वय २२ वर्ष, रा.आष्टा हा बेला येथुन आष्टा येथे जात असतांना बेला बस स्टॉप जवळ ४ अनोळखी इसमांनी फिर्यादीस हात बुक्कयाने व लोखंडी सळईने डोक्यावर, खांदयावर व पाठीवर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अशोक चव्हाण हे करीत आहे.

## अपघातात जखमी

**पो.स्टे. केळवद** :- अंतर्गत २८ कि.मी अंतरावर खुर्सापार शिवार आर.टी.ओ. बॅरेग जवळ येथे दिनांक १६/०७/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील आरोपी बजाज बॉक्सर क्र. एमपी-२८/डीपी-९२९७ च्या चालक नामे- निलेश रहाटे, रा. आंजनगाव याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी नामे- मंगेश तुळशीराम घोळसे, वय ३२ वर्ष, रा. चिचपुरा, सावनेर याच्या मोटरसायकल क्र. एमएच-४०/एबी-२७४० ला मागुन धडक मारल्याने अपघातात फिर्यादीची पत्नी व लहान मुलगी नामे- पुरवा यांचे अपघातात जखमी होण्यास आरोपी चालक हा कारणीभुत झाला आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७ भादंवी. तसेच सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. सुभाष राठोड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**